<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १२८/२०२५.</u>
<u>अनिता भ्र. मनोज अग्रवाल व इतर वि. निरंक</u>
<u>CNR No : MHBI130006202025.</u>

<u>:: निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश ::</u>

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र. १ यांची सासु व अर्जदार क्र. २ व ३ यांची आज्ञी नामे **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** हया दिनांक ३०/०६/२०२४ रोजी निघोजे ता. खेड, जि. पुणे येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** चे पती नामे **प्रल्हाद पि. दुर्गादास अग्रवाल** हे दि. १२-१०-२०२४ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** यांचा मुलगा, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील नामे **मनोज पि. प्रल्हाद अग्रवाल** हे दि. २५-०४-२०२३ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार क्र. १ ही सुन व अर्जदार क्र. २ व ३ नातु या नात्याने मयतास कायदेशीर वारस आहेत. तसेच मयत **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** यांना अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाही. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** प्रकरणात आदेश पारीत करून दिनांक ०८/०३/२०२५ रोजीचे दैनिक **"दै. महाराष्ट्र प्रतिमा"** या वर्तमानपत्रात सदर प्रकरणाबाबत जनतेस जाहीर नोटीस बजाविण्यात आले. त्या वर्तमानपत्राची आवृत्ती नि. ११ वर अभिलेखावर दाखल आहे.

**०४.** अर्जदार क्र. १ अनिता भ्र. मनोज अग्रवाल यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र. १२ प्रमाणे अभिलेखावर दाखल केला आहे. अर्जदारांची पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्र. १८ वर आहे. अर्जदार हेच मयत **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** यांचे

कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांनी मृतक **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. १७ वर, वारसाचे कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र नि.क्र. ०७ वर व अर्जदार यांचे आधार कार्ड च्या प्रती नि.क्र. ०८ ते १० वर दाखल केल्या आहेत.

**०५.** जनतेस जाहीर नोटीस देवुन सुध्दा आजपावेतो वारसप्रमाणपत्र देण्याबाबत कोणतेच आक्षेप न्यायालयास प्राप्त झाले नाही. म्हणुन अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून अर्जदार हेच मृतकाचे वारस असल्याचे दिसुन येते. म्हणुन खालील आदेश पारीत.

**:: आदेश ::**

**०१.** अर्ज मंजुर.

**०२.** न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ मधील अपेन्डीक्स-बी प्रमाणे **अर्जदार क्र. ०१. अनिता भ्र. मनोज अग्रवाल, ०२. ध्रुव पि. मनोज अग्रवाल, आणि ०३. तनीष पि. मनोज अग्रवाल** यांना मयत **श्रीमती सुमित प्रल्हाद अग्रवाल** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

**०३.** बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये दिल्या जाणा-या प्रमाणपत्रासोबत दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ मध्ये दिलेल्या सुचना जोडाव्यात.

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2026.05.05 11:26:48 +0530

दिनांक – ०५/०५/२०२६.
ठिकाण - परळी वैजनाथ.

**( दिपक रु. बोर्डे )**
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)
परळी वैजनाथ